निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
गुरुवार
२२ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२८ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# शिवसेनेच्या भवितव्याचा फैसला लांबणीवर; 'धनुष्यबाण' गोठवला जाणार?

## असीम सरोदेंचे खळबळजनक भाकीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी/** गेल्या साडेतीन वर्षांपासून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या शिवसेना नाव आणि पक्षचिन्हाचा निकाल पुन्हा एकदा लांबणीवर पडला आहे. सर्वोच्च न्यायालयात बुधवारी होणारी अंतिम सुनावणी आता शुक्रवारी, २३ जानेवारी रोजी होणार आहे. या विलंबामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ असीम सरोदे यांनी चिन्हाबाबत व्यक्त केलेल्या एका शक्यतेने खळबळ उडवून दिली आहे.

**सुनावणी का लांबणीवर पडली?**

सर्वोच्च न्यायालयाने मागील सुनावणीत २१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता अंतिम सुनावणी घेण्याचे निश्चित केले होते. मात्र, आज दोन मुख्य कारणांमुळे ही सुनावणी होऊ शकली नाही:

१. सॉलिसिटर जनरल यांची विनंती: दुसऱ्या एका महत्त्वाच्या प्रकरणात उपस्थित राहायचे असल्याने त्यांनी वेळ मागून घेतली.

२. विशेष खंडपीठाचे कामकाज: न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाला बागची हे दुपारी १ नंतर अरावली डोंगर रांगांबाबतच्या विशेष प्रकरणाची सुनावणी करणार असल्याने शिवसेना प्रकरणासाठी वेळ अपुरा पडला.




**असीम सरोदे यांचे 'धक्कादायक' भाकीत**

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना असीम सरोदे यांनी निकालाच्या संभाव्य दिशेवर भाष्य केले. त्यांच्या दाव्यानुसार:

चिन्हाबाबत पेच: निवडणूक चिन्ह 'धनुष्यबाण' हे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मिळू शकते किंवा ते कायमस्वरूपी गोठवले (त्रीशशूश) जाण्याचीही दाट शक्यता आहे.

लोकशाहीला धोका: पक्ष फोडण्याची ही पद्धत भविष्यात भाजपसाठीही उलटण्याची शक्यता असून, अशा प्रकरणांवर तातडीने स्पष्टता येणे लोकशाहीसाठी गरजेचे आहे.

निवडून आलेल्या प्रतिनिधींचे काय?: या निकालाचा परिणाम विद्यमान खासदार, आमदार किंवा नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेवकांच्या पदावर होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### पुढील दिशा: 'शुक्रवार' ठरणार निर्णायक!

आता या प्रकरणाची अंतिम सुनावणी शुक्रवारी सकाळी ११ वाजता सुरू होईल. दोन्ही बाजूंना युक्तिवादासाठी ५ तासांचा वेळ दिला जाण्याची शक्यता आहे. महानगरपालिका निवडणुकांच्या निकालानंतर राज्याच्या सत्ता समीकरणांवर या निकालाचा मोठा परिणाम होणार असल्याने संपूर्ण महाराष्ट्राची नजर आता शुक्रवारच्या सुनावणीकडे लागली आहे. साडेतीन वर्षे उलटूनही तारीख पे तारीख मिळत असल्याने न्यायव्यवस्थेच्या विलंबामुळे राजकीय अस्थिरता वाढत असल्याची टीकाही सरोदे यांनी यावेळी केली.

## संक्षिप्त

### दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त अभियानासाठी शिक्षण मंडळ सज्ज

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी आणि मार्च २०२६ दरम्यान उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) आणि माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) लेखी परीक्षा आयोजित करण्यात आल्या आहेत. या परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळ सज्ज असल्याचे मंडळाच्या मुंबई विभागीय सचिवांनी कळविले आहे.

इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षांमध्ये कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळामार्फत सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक यांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करण्यात आले आहेत. परीक्षेकरिता दक्षता समिती गठीत करण्यात आली असून भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा कशी द्यावी तसेच परीक्षा देताना काय करावे आणि काय करू नये, याबाबतही सूचना देण्यात आल्या असल्याचे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

# ठाकरे बंधूंमध्ये ठिणगी! कल्याण-डोंबिवलीत मनसेचा शिंदेंना पाठिंबा; उद्धव ठाकरेंना मोठा धक्का

**आत्ताच एक्सप्रेस**

**कल्याण/डोंबिवली/ प्रतिनिधी/** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या (घऊ्वउ) निकालानंतर राज्याच्या राजकारणात सर्वात मोठी उलथापालथ झाली आहे. शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे यांच्यातील वाद आता चव्हाट्यावर आला असून, राज ठाकरे यांच्या मनसेने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे केडीएमसीत सत्ता स्थापनेचे गणित पूर्णपणे बदलले असून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला खिंडार पडल्याचे चित्र आहे.



### पक्षनिहाय अंतिम चित्र (१२२ जागा)

शिवसेना (एकनाथ शिंदे) ५३, भाजप ५०, शिवसेना (उद्धव ठाकरे) ११, मनसे ०५, । काँग्रेस ०२, राष्ट्रवादी (शरद पवार) ०१ कल्याण-डोंबिवलीत 'मनसे-शिंदे' युती झाल्याने आगामी मुंबई महापालिका महापौर निवडीवर याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे. ठाकरेंचे नगरसेवक फोडण्यात यश आल्याने शिंदे गटाचे पारडे सध्या जड दिसत आहे.

**संख्याबळाची नवी बेरीज: शिंदेंची सरशी :** बहुमतासाठी आवश्यक असलेला ६२ हा जादूचा आकडा गाठण्यासाठी मोठी रस्सीखेच सुरू होती. शिंदेंची शिवसेना: ५३ (स्वबळावर) + ७ (मनसे व ठाकरे गटातून आलेले) = ६० भाजप: ५० शिवसेना: ११ (यातून ४ नगरसेवक फुटल्याने आता केवळ ७ शिल्लक) मनसे: ५ (स्वतःचे)

**'ठाकरे' गटाला मोठे खिंडार :** ठाकरे गटाचे ११ नगरसेवक निवडून आले होते, मात्र सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू होताच मोठी फुट पडली: १. नॉट रिचेबल नगरसेवक: मधुर म्हात्रे आणि किर्ती ढोणे हे निकालानंतर लगेच बेपत्ता झाले होते, ते शिंदे गटात सामील झाल्याची चर्चा आहे. २. घरवापसी: ठाकरे गटातील दोन नगरसेवक (जे पूर्वी मनसेत होते) त्यांनी पुन्हा मनसेची वाट धरली आहे. ३. कोकण भवन येथे दांडी: गट नोंदणीवेळी ठाकरे गटाचे ४ नगरसेवक गैरहजर राहिल्याने आता उबाठा गटावर कायदेशीर कारवाई करण्याची वेळ आली आहे.

**मनसेचा पाठिंबा; भाजपला शह? :** खासदार श्रीकांत शिंदे यांनी या युतीची अधिकृत घोषणा केली. विकासाच्या मुद्द्यावर मनसेने आम्हाला पाठिंबा दिला आहे. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी ही रणनीती असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, महापौर कोणाचा होणार याचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**ठाकरे गट कायदेशीर लढाईच्या तयारीत :** मशाल चिन्हावर निवडून येऊनही जे नगरसेवक तटस्थ राहिले किंवा दुसऱ्या गटात सामील झाले, त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यासाठी ठाकरे गटाने हालचाली सुरू केल्या आहेत.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात संघर्षाची ठिणगी!

# आदिवासींचे आंदोलन; १०५३ एकर वनजमिनीचा वाद पेटला




**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई-ठाणे/प्रतिनिधी/** मुंबईचे फुफ्फुस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील जमीन हक्क आणि आदिवासींच्या विस्थापनाचा मुद्दा आता चांगलाच तापला आहे. वन विभागाने घरं रिकामी करण्याच्या नोटीस धाडल्याचा आरोप करत आदिवासी समाज आक्रमक झाला असून, दुसरीकडे १०५३ एकर वनजमीन खासगी व्यक्तींच्या नावावर करण्याच्या हालचालींविरुद्ध पर्यावरणप्रेमींनी एल्गार पुकारला आहे.

**आदिवासी आक्रमक: बोरिवलीत प्रवेशद्वारावर निदर्शनं :** वन विभागाने आदिवासी पाड्यांना घरं रिकामी करण्याच्या नोटिसा दिल्याने आणि उद्यानातील बस सेवा बंद केल्याने संतापाची लाट उसळली आहे. आरोप: प्रशासनाकडून आदिवासींना विस्थापित करण्याचा प्रयत्न होत असून मूलभूत सुविधा रोखल्या जात आहेत. प्रशासनाचे स्पष्टीकरण: उद्यान प्रशासनाने थेट नोटीस दिल्याचा दावा फेटाळला आहे. आम्ही कोणालाही वैयक्तिक नोटीस दिली नसून, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केवळ सार्वजनिक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत, असे स्पष्टीकरण प्रशासनाकडून देण्यात आले.

**१०५३ एकर वनजमिनीचा पेच; खासगी मालकीला विरोध :** या प्रकरणातील सर्वात मोठा वाद ३१ डिसेंबर २०२५ च्या त्या सरकारी आदेशावरून आहे, ज्यामध्ये उद्यानातील १०५३ एकर जमीन खासगी व्यक्तींच्या नावावर करण्यास मान्यता देण्यात आली होती. हस्तक्षेप याचिका: 'येऊर एन्व्हायर्नमेंटल सोसायटी'चे अध्यक्ष रोहित जोशी यांनी या आदेशाविरोधात महसूल मंत्र्यांकडे हस्तक्षेप अर्ज दाखल केला आहे. पर्यावरणप्रेमींचा दावा: ही जमीन महसूल दप्तरी 'आरक्षित वन' म्हणून नोंदवलेली आहे. खासगी व्यक्तींना ही जमीन हस्तांतरित करणे बेकायदेशीर असून यामुळे शहरी जंगलांचे अस्तित्व धोक्यात येईल.

**उद्या 'कोकण विभागीय आयुक्तां'समोर महत्त्वाची सुनावणी :** महसूल मंत्र्यांच्या वादग्रस्त निर्णयावर चहूबाजूंनी टीका झाल्यानंतर, या निर्णयाला स्थगिती देऊन पुनर्विचार याचिका दाखल करण्याची मुभा जिल्हाधिकारी आणि वनविभागाला देण्यात आली होती. सुनावणीची तारीख: उद्या, २२ जानेवारी २०२६ रोजी कोकण विभागीय आयुक्तांसमोर या प्रकरणावर अंतिम सुनावणी पार पडणार आहे. आवाहन: मुंबई आणि ठाण्यातील सर्व पर्यावरणप्रेमींनी या लढ्याला पाठिंबा द्यावा, असे आवाहन रोहित जोशी यांनी केले आहे.

# अकोल्याचे 'हुंडीवाले हत्या प्रकरण': १० आरोपींना जन्मठेप!

**आत्ताच एक्सप्रेस**

**अकोला/प्रतिनिधी/** संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या अकोल्यातील 'किसनराव हुंडीवाले' हत्या प्रकरणाचा आज जिल्हा सत्र न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे. तब्बल ६ वर्षांनंतर आलेल्या या निकालात १० आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली असून, पुराव्याअभावी ५ जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. विशेष सरकारी वकील खासदार उज्ज्वल निकम यांनी या खटल्यात सरकारची बाजू मांडली.

**कोणा-कोणाला झाली जन्मठेप?**

### भाजपच्या माजी महापौरांच्या पती व मुलासह बड्या नेत्यांना धक्का

या प्रकरणातील मुख्य आरोपींमध्ये अकोल्याच्या पहिल्या महापौर सुमन गावंडे यांच्या कुटुंबातील सदस्यांचा समावेश आहे. जन्मठेप झालेल्यांमध्ये प्रामुख्याने: श्रीराम गावंडे (निवृत्त पोलीस निरीक्षक व महापौरांचे पती) विक्रम उर्फ छोटू गावंडे (भाजयुमोचे तत्कालीन प्रदेश उपाध्यक्ष) रणजीत गावंडे, धीरज गावंडे, प्रल्हाद गावंडे, दिनेश राजपूत, प्रतीक तोंडे, विशाल तायडे, सतीश तायडे आणि मयूर अहिर.

### थरारक हत्याकांड: नेमकं काय घडलं होतं?

६ मे २०१९ रोजी दुपारी १२ च्या सुमारास अकोल्यातील सर्वात गजबजलेल्या अशोक वाटिका चौकातील 'सार्वजनिक न्यास नोंदणी' कार्यालयात हे हत्याकांड घडले होते. विशेष म्हणजे, हे कार्यालय जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या निवासस्थानालगत आहे. हल्ला: शिक्षण संस्थेच्या मालकी हक्काच्या वादातून आरोपींनी किसनराव हुंडीवाले यांच्यावर लाकडी फर्निचर आणि अग्निशमन यंत्राच्या (सिलेंडर) सहाय्याने भीषण हल्ला केला. जागेवरच मृत्यू: या हल्ल्यात हुंडीवाले यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे वकील नितीन धूत हे देखील जखमी झाले होते.

**कोण होते किसनराव हुंडीवाले? :** किसनराव हुंडीवाले हे अकोल्यातील एक बडे प्रस्थ होते: गवळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांची मोठी ओळख होती. ते अकोल्यातील प्रसिद्ध प्रॉपर्टी व्यावसायिक आणि केंद्रीय माजी गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांचे जवळचे नातेवाईक होते. अकोल्यातील कौलखेड आणि खडकी परिसरातील राजकारणावर त्यांची मोठी पकड होती.

**विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची प्रतिक्रिया :** या प्रकरणात १० आरोपींविरुद्ध सबळ पुरावे सादर करण्यात आले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे, असे मत खासदार उज्ज्वल निकम यांनी निकालानंतर व्यक्त केले. पुराव्याअभावी उर्वरित ५ जणांना मात्र दिलासा मिळाला आहे.

# ज्ञान, तंत्रज्ञान आणि १ लाख कोटींची गुंतवणूक: मुख्यमंत्री फडणवीस यांचा दावोस दौरा यशस्वी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** स्वित्झर्लंडमधील दावोस येथे आयोजित 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या वार्षिक बैठकीत महाराष्ट्राने आपला प्रभाव पाडला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दौऱ्याचा मुख्य उद्देश राज्यात केवळ विदेशी गुंतवणूक आणणेच नव्हे, तर प्रगत ज्ञान आणि तंत्रज्ञान मिळवणे हा असल्याचे स्पष्ट केले. या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी राज्याच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या 'तिसरी मुंबई' अंतर्गत रायगड-पेण ग्रोथ सेंटरची महत्त्वाची घोषणा करण्यात आली.

**तिसरी मुंबई आणि १ लाख कोटींची गुंतवणूक :** नवी मुंबई विमानतळापासून अवघ्या १५-२० किमी अंतरावर हे 'ग्रोथ सेंटर' उभारले जाणार आहे. 'प्लग अँड प्ले' धर्तीवर आधारित हे देशातील पहिले शहर असेल, जे सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून विकसित केले जाईल. या ठिकाणी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर एक भव्य बिझनेस डिस्ट्रिक्ट, ग्लोबल कॅपॅसिटी सेंटर्स आणि फिनटेक इकोसिस्टम तयार केली जाईल. या प्रकल्पामुळे सुमारे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, जगातील दिग्गज कंपन्यांनी (उदा. कोरियाचा हवाना ग्रुप, स्वित्झर्लंडचा एसएसबी ग्रुप, फेडेक्स, आणि सिंगापूरचे मेपल ट्री) यासाठी सामंजस्य करार केले आहेत. 'वॉक टू वर्क' संस्कृतीवर आधारित हे शहर रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण करेल.

**जागतिक विद्यापीठांशी तांत्रिक करार :** राज्यातील नागरी सुविधा आणि वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी जगप्रसिद्ध संस्थांशी तांत्रिक करार केले आहेत. यात युनिव्हर्सिटी ऑफ




कॅलिफोर्निया, बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक आणि सिंगापूरच्या सुबाना जुराँग यांसारख्या संस्थांचा समावेश आहे. अर्बन प्लॅनिंग आणि ट्रान्सपोर्ट क्षेत्रातील या करारामुळे महाराष्ट्रातील शहरांचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होईल.

**आरोग्य आणि तंत्रज्ञान :** राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मेड-टेक स्टार्टअप्सवर भर दिला आहे. दावोसमध्ये जागतिक स्तरावरील कंपन्यांशी चर्चा करून राज्यात मेड-टेक इकोसिस्टम विकसित करण्याचा रोडमॅप निश्चित करण्यात आला आहे.

### मॅग्नेटिक महाराष्ट्र पॅव्हेलियनचे आकर्षण

दावोसमध्ये उभारण्यात आलेले 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' पॅव्हेलियन जागतिक गुंतवणूकदारांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरले. भारताचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनीही या पॅव्हेलियनला भेट देऊन मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. एकंदरीत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा दावोस दौरा महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीकडे नेण्यासाठी आणि 'तिसरी मुंबई' सारख्या जागतिक दर्जाच्या शहरांच्या निर्मितीसाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

**जागतिक नेत्यांशी आणि कंपन्यांशी संवाद :** जागतिक बँक: अध्यक्ष अजय बंगा यांच्याशी महाराष्ट्रात 'ग्रीन इंडस्ट्रियल कॉरिडॉर' विकसित करण्याबाबत चर्चा झाली. यामुळे एमएसएमई क्षेत्राला आणि निर्यातीला मोठी चालना मिळेल.

ह्युंदाई: कंपनीचे अध्यक्ष सुंग किम यांनी महाराष्ट्राच्या ईव्ही धोरणाचे कौतुक करत ५ नवीन मॉडेल्स लाँच करण्याची घोषणा केली.

मर्सेक: विन्सेंट क्लार्क यांनी महाराष्ट्रात २.५ बिलियन डॉलर्सच्या टर्मिनल संधीबाबत सकारात्मकता दर्शविली.

इतर भेटी: बर्मुडाचे पंतप्रधान डेव्हिड बर्ट, फिनलंडचे मंत्री विले त्याविओ आणि इस्रायल इनोव्हेशन अथॉरिटीच्या अध्यक्षांशी विविध नाविन्यपूर्ण प्रकल्पांवर चर्चा झाली.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस



# नेताजी सुभाषचंद्र भोस : समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी मार्ग

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र भोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.

नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता.

नेताजींच्या सामाजिक जाणीवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ



राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.

भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता ही नेताजींसाठी अत्यंत वेदनादायी बाब होती. जन्माच्या आधारे माणसामाणसांत भेद करणे हे अमानवी असून राष्ट्राच्या एकात्मतेसाठीही घातक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. जातिव्यवस्थेमुळे समाजाचा मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, सामाजिक सन्मान आणि मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. नेताजींनी या अन्यायाविरुद्ध केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतूनही संघर्ष केला. आजाद हिंद सेनेत जात, धर्म किंवा प्रांत यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वांना समान संधी देण्यात आली. सैनिकांना एकाच पंक्तीत उभे राहून भोजन करणे, समान शिस्त पाळणे आणि एकाच ध्येयासाठी लढणे, ही सामाजिक समतेची जिवंत उदाहरणे होती.

स्त्री–सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले. आजाद हिंद सेनेतील 'राणी झाशी रेजिमेंट' ही भारतीय इतिहासातील स्त्री–मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते. नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये आर्थिक न्यायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था शोषणावर आधारित होती. शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्ग दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि असुरक्षिततेच्या गर्तेत अडकलेला होता. नेताजी समाजवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारताने अशी आर्थिक व्यवस्था स्वीकारली पाहिजे, जिथे संपत्ती काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित न राहता समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी वापरली जाईल. राज्याने लोककल्याणकारी भूमिका बजावून आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी त्यांची भूमिका होती.

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन 'जय हिंद'चा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होता.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती. शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये शिस्त, कर्तव्यभावना आणि नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर जबाबदाऱ्यांची जाणीवही आहे. आजाद हिंद सेनेतील कठोर शिस्त ही केवळ लष्करी गरज नव्हती, तर भावी भारतीय समाजासाठीचा नैतिक आदर्श होती. भ्रष्टाचार, स्वार्थ आणि नैतिक अधःपतन यांचा त्यांनी तीव्र निषेध केला.

युवाशक्तीवर नेताजींचा अपार विश्वास होता. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार असून सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी त्यांच्यावरच आहे, असे ते मानत. भीती, न्यूनगंड आणि निष्क्रियता यांचा त्यांनी तीव्र निषेध केला. ध्येयासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, त्यागाची वृत्ती आणि राष्ट्रासाठी बलिदान देण्याची क्षमता हीच युवकांची खरी ओळख असावी, असा त्यांचा संदेश होता.

नेताजी सुभाषचंद्र भोस यांचे सामाजिक कार्य आजच्या काळात अधिकच अर्थपूर्ण वाटते. वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, स्त्री–असमानता, सामाजिक तणाव आणि सांप्रदायिकता यांसारख्या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत नेताजींचा समतावादी, शिस्तप्रिय आणि राष्ट्रकेंद्री दृष्टिकोन आपल्याला मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या विचारांमध्ये केवळ संघर्षाची भाषा नाही, तर समाजबांधणीची स्पष्ट दिशा आहे.

२३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र भोस यांची जयंती साजरी करताना त्यांच्या केवळ शौर्याचे नव्हे, तर त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता, स्त्री–समानता, आर्थिक समतोल आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित भारत निर्माण करणे हेच नेताजींना खरे अभिवादन ठरेल. नेताजी हे इतिहासातील एक महान योद्धा नसून ते आजही भारतीय समाजाच्या आत्म्याला प्रेरणा देणारे जिवंत विचार आहेत.

– **डॉ. राजेंद्र बगाटे**, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल - bagate.
rajendra5gmail.com

# माध्यमांची न्यायिक घुसखोरी: न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याला धोका?

माध्यम यांमार्फत चालवले जाणारे खटले (मीडिया ट्रायल्स) हे न्यायव्यवस्थेच्या कारकिर्दीला कायमस्वरूपी उद्ध्वस्त करण्याची क्षमता ठेवतात, अशा कठोर शब्दांत देशाचे माजी महान्यायवादी आणि ज्येष्ठ विधिज्ञ मुकुल रोहतगी यांनी आपली भीती व्यक्त केली आहे. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या प्रकरणाचा दाखला देत, माध्यमांच्या सततच्या नकारात्मक वार्तांकनामुळे होणारी प्रतिष्ठेची हानी, न्यायालयीन निर्दोष मुक्ततेनंतरही भरून न येणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या गंभीर विषयावर बोलताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धन्नावत यांनी आपली भूमिका मांडली असून, न्यायप्रक्रियेत माध्यमांचा वाढता हस्तक्षेप लोकशाहीसाठी घातक असल्याचे म्हटले आहे.

**ज्येष्ठ विधिज्ञ मुकुल रोहतगी यांच्याकडून तीव्र चिंता व्यक्त**

आमिर खान लिखित 'बियॉन्ड हेडलाइन्स: व्हॉल्यूम १ – द मीडियम अँड इट्स म्यूटेशन्स' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात आयोजित एका परिसंवादात रोहतगी बोलत होते. ते म्हणाले की, एखाद्या न्यायाधीशांच्या घरात पैसे सापडल्याचा आरोप झाल्यास, संपूर्ण माध्यम जगत त्यांना दोषी ठरवून मोकळे होते. भविष्यात जरी ते निर्दोष सुटले, तरी समाजाच्या नजरेत त्यांची प्रतिमा डागाळली राहते. अशा परिस्थितीत, त्यांच्या प्रकरणाचा निकाल काहीही लागो, त्यांची कारकीर्द मात्र संपुष्टात येते. रोहतगी यांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्या याचिकेवर बाजू मांडली होती, त्यात त्यांनी आपल्यावर महाभियोग प्रक्रियेसाठी लोकसभा अध्यक्षांनी स्थापन केलेल्या त्रिसदस्यीय समितीला आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली आहे.

या गंभीर मुद्द्यावर आपली प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धन्नावत म्हणाले, माध्यमांनी लक्ष्मणरेषा ओलांडली आहे. वार्तांकन आणि न्यायदान यात मोठी दरी आहे. जेव्हा माध्यमे स्वतःच न्यायाधीश, फिर्यादी आणि जल्लाद अशा तिहेरी भूमिकेत असतात, तेव्हा निष्पक्ष न्यायप्रक्रियेत गळा घोटला जातो. एखाद्या व्यक्तीला, मग ती सामान्य असो वा न्यायाधीश, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण लाभ मिळण्याआधीच 'समाजद्रोही' ठरवणे हे केवळ अन्यायकारक नाही, तर भारतीय संविधानाने दिलेल्या सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचे थेट उल्लंघन आहे.

रोहतगी यांनी पुढे सांगितले की, दूरचित्रवाहिन्यांवर सतत एकाच व्यक्तीचा चेहरा दाखवून त्याला 'गुंड' म्हणून संबोधल्याने सोशल मीडियापेक्षाही जास्त आणि दीर्घकाळ टिकणारे नुकसान होते. माध्यमांच्या या भूमिकेमुळे न्यायालयाच्या निर्णयाआधीच 'झटपट न्याय' दिला जातो, जो पुराव्यांवर आधारित नसून केवळ आरोपांच्या पुनरावृत्तीवर अवलंबून असतो. त्यांनी माध्यमांच्या स्वातंत्र्याचा आदर करत, अनुच्छेद १९(१)(अ) अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर खासगी आयुष्य, मानवी प्रतिष्ठा आणि निष्पक्ष खटल्याच्या अधिकाराला पायदळी तुडवण्यासाठी केला जात असल्याबद्दल खंत व्यक्त केली.

याच परिसंवादात सहभागी झालेले ज्येष्ठ विधिज्ञ पर्सिवल बिलिमोरिया यांनीदेखील माध्यमांमधील चुकीच्या माहितीमुळे न्यायालयीन दृष्टिकोनावर कसा परिणाम होतो, यावर प्रकाश टाकला. भटक्या कुत्र्यांच्या एका चालू खटल्याचा संदर्भ देत ते म्हणाले की, कुत्रे मुलांचा जीव घेतात, या चुकीच्या आणि व्यापकपणे पसरलेल्या कथेमुळे न्यायालये प्रभावित होत आहेत. ते म्हणाले, आज आपल्या न्यायाधीशांचा प्रामाणिकपणे विश्वास बसला आहे की कुत्रे मुलांची हत्या करतात, पण हे सत्य नाही. आपण अशा प्रतिध्वनीच्या खोलीत जगू शकत नाही.

ड. धन्नावत यांनी यावर जोर देत म्हटले की, न्यायाधीशांनी केवळ न्यायालयात सादर झालेल्या पुराव्यांच्या आणि कायद्याच्या आधारे निर्णय द्यावा, माध्यमांनी तयार केलेल्या जनमताच्या दबावाखाली नाही. जर माध्यमेच निकाल ठरवू लागली, तर न्यायालयांची गरजच काय उरते? ही प्रवृत्ती केवळ न्यायव्यवस्थेसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी अत्यंत धोकादायक आहे. कायद्याचे राज्य टिकवण्यासाठी माध्यमांनी आत्मपरीक्षण करणे आणि आपली जबाबदारी ओळखणे नितांत गरजेचे आहे.

बिलिमोरिया यांनी स्पष्ट केले की, माध्यमांमधील वृत्तांची सतत पुनरावृत्ती आणि अल्गोरिदममुळे निर्माण होणाऱ्या प्रतिध्वनीमुळे, पडताळणी न झालेल्या गोष्टी कालांतराने सत्य वाटू लागतात. त्यांनी भारतीय संविधानातील अनुच्छेद ५१–अ चा संदर्भ दिला, ज्यात सजीवांप्रति करुणा बाळगण्याचे कर्तव्य नमूद आहे. त्यांच्या मते, भटक्या कुत्र्यांचा प्रश्न हा धोक्याचा नसून, शासकीय निर्बीजीकरण आणि प्राणी नियंत्रण कार्यक्रमांच्या अपयशाचे परिणाम आहे.

एकंदरीत, या परिसंवादातून एक गंभीर संदेश पुढे आला आहे की, माध्यमांनी आपली जबाबदारी ओळखून वार्तांकन करावे आणि न्यायालयीन प्रक्रियेत हस्तक्षेप करणे टाळावे. अन्यथा, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि निष्पक्षता धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. ड. महेश धन्नावत यांनी शेवटी सांगितले की, माध्यमांचा पहारेकऱ्याचा रोल आम्ही मान्य करतो, पण त्यांनी न्यायाधीशाची भूमिका बजावण्याचा प्रयत्न करू नये. सत्य आणि न्यायाचा मार्ग न्यायालयातूनच जातो, माध्यमांच्या स्टुडिओतून नाही. – **ड. महेश एस धनवंत**

# ट्रम्प यांची अरेरावी आता ग्रीनलँडवर डोळा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची अरेरावी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अमेरिकेने तेलासाठ्यासाठी व्हेनेझुएला या छोट्याशा देशावर अरेरावी करून त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांचे अपहरण करून त्यांना अटक केली आणि स्वतःला व्हेनेझुएला या देशाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर त्यांनी इराणमधील आंदोलनांना हवा देऊन तो देश अस्थिर करण्याचा डाव आखला इतकेच नाही तर इराणवर अमेरिका मोठा हल्ला करेल आणि इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी यांना पदच्युत करण्याची धमकी देऊन त्या देशावर अरेरावी केली. अमेरिकेच्या या अरेरावीचा संपूर्ण जग निषेध करत असतानाच ट्रम्प यांची नजर अमेरिकेचा शेजारी असलेला ग्रीनलँड या छोट्या देशावर पडली आणि हा देश देखील आपल्या घशात घालण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला आणि ग्रीनलँड हा अमेरिकेचाच एक भाग असून लवकरच ग्रीनलँड हे अमेरिकेतील नवे राज्य असेल अशी घोषणा केली. ग्रीनलँडने स्वतःहून अमेरिकेत विलीन व्हावे आणि जर ग्रीनलँड स्वतःहून अमेरिकेत विलीन झाला नाही तर अमेरिका लष्करी बळ वापरून त्या देशाला अमेरिकेत विलीन करेल अशी धमकी दिली. इतकेच नाही तर जे देश ग्रीनलँडचे समर्थन करतील त्या देशांवर अमेरिका जबर आयात शुल्क अर्थात टेरिफ लावेल असा सज्जड दम देऊन त्यांना ब्लॅकमेल केले. ग्रीनलँडला समर्थन देणाऱ्या युरोपीय देशांना केलेले हे ब्लॅकमेलच आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या ब्लॅकमेली विरुद्ध युरोपात मोठा संताप व्यक्त केला जात आहे. ट्रम्प यांच्या या अरेरावी विरुद्ध डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगन आणि इतर शहरात हजारो लोकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले आणि ग्रीनलँड हा विकाऊ देश नाही अशा घोषणा दिल्या. इंग्लंड, फ्रान्स या देशांनी देखील ट्रम्प यांच्या या धोरणावर टीका केली असून डोनाल्ड ट्रम्प यांनी ही अरेरावी थांबवावी असे निवेदन दिले आहे. केवळ युरोपच नव्हे तर संपूर्ण जग अमेरिकेच्या अरेरावी विरुद्ध एकजूट होत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिका खंडातही खदखद आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विस्तारवादी धोरणाविरुद्ध दक्षिण अमेरिका खंडातील देशातीलही मोठी नाराजी आहे. आज या देशांनी जाहीरपणे तसे बोलून दाखवले नसले तरी ते ही डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर नाराज आहेत. अमेरिकेतील नागरिकांनाही ट्रम्प यांचे हे विस्तारवादी धोरण मान्य नाही पण ट्रम्प आपली हेकेखोरी सोडायला तयार नाही. काहीही करून आपल्या शेजारी असलेल्या लहान देशांना अमेरिकेत विलीन करून घ्यायचे, तेल संपन्न राष्ट्रांवर ताबा मिळवून तेथील तेलासाठे ताब्यात घ्यायचे तसेच जे आपले ऐकणार नाही त्यांच्यावर जबर आयात शुल्क अर्थात टेरीफ लावून त्यांना ब्लॅकमेल करायचे आणि संपूर्ण जगावर आपली एकहाती हुकूमत गाजवायची हे ट्रम्प यांचे धोरण आहे आणि ट्रम्प यांचे हेच विस्तारवादी धोरण जगाला युद्धाच्या खाईत घेऊन जाईल हे मात्र नक्की.

– **श्याम ठाणेदार**, दौंड जिल्हा पुणे,
९९२२५४६२९५

# भारतीय संस्कृतीचा गौरव– श्री गुरु तेगबहादुर साहिब

'हिंद दी चादर', म्हणजेच भारतभूमीचे कवच, अशी शीखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांची जगाला ओळख आहे. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेगबहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने नागपुरातील यशस्वी आयोजनानंतर आता नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी रोजी भव्य अशा आध्यात्मिक समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या निमित्ताने गुरु तेगबहादुर साहिब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख....

सत्याचा मार्ग आणि अहिंसेचे तत्त्व हे भारतीय विचारांचे एक अविभाज्य अंग आहे. हे तत्त्व केवळ शारीरिक हिंसा न करण्याइतपत मर्यादित नसून, अगदी मनातही कोणाबद्दल द्वेष बाळगू नये, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. भारतीय संस्कृतीने जगाला विविधतेत एकता जोपासण्याचा मंत्रही दिला. 'एकम सत् विप्रा बहुधा वदंती' म्हणजेच सत्य एकच आहे, परंतु विद्वान लोक ते वेगवेगळ्या प्रकारे मांडतात, हे ऋग्वेदातील सूत्र भारतीय संस्कृतीतील धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा मूळ आधार मानले जाते. जिथे पाश्चात्य संस्कृती उपभोगावर भर देते, तिथे भारतीय संस्कृती त्याग आणि बलिदानाला महत्त्व देते. या मूळ विचारांचे स्मरण येथील जनसमुदायाला सातत्याने करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी या भारतभूमीत जन्म घेतला. जगाला समता, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या शीख समुदायाच्या तेजस्वी परंपरेत जन्मलेले गुरु तेगबहादुर साहिब हे अशाच महापुरुषांपैकी आहेत.

गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हा भारतीय मध्ययुगीन इतिहासातील समर्पणाच्या भावनेचा महत्त्वपूर्ण आणि शाश्वत अध्याय ठरतो. श्री गुरु नानकदेव असोत,



श्री गुरु तेगबहादुर साहिब असोत की श्री गुरु गोविंद सिंह साहिब असोत, या साऱ्या महापुरुषांनी परकीय जुलूमशाहीच्या काळात भारतभूमीतील जनतेचे स्वत्व, आत्मसन्मान जागविण्याचे तसेच दिशाहीन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे श्री गुरु तेगबहादुर साहीब यांचे स्मरण झाले की आजही त्यांचे विचार आणि मानवतेसाठी त्यांनी दिलेल्या बलीदानाचा इतिहास डोळ्यापुढे सरकतो.

**जन्म आणि पार्श्वभूमी :** गुरु तेगबहादुर साहिब यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर येथे शीखांचे सहावे गुरु श्री हरगोविंद साहिब यांच्या घरी झाला. गुरु हरगोविंद साहिब यांच्या पाच पुत्रांपैकी ते धाकटे होते. ते अध्यात्मिक रंगात रंगलेले, अंतर्मुख आणि मौनप्रिय होते. गुरुपदाच्या गादीची जबाबदारी स्वीकारल्यावर गुरु तेगबहादुर साहिब यांनी शीख समाजाला संघटित करण्याचे प्रयत्न सुरु केले. १६६५ च्या सुमारास त्यांनी आनंदपूर नावाचे स्थळ वसवले. पुढे ते 'आनंदपूर साहिब' म्हणून प्रचलित झाले. शीख धर्मातील अत्यंत पवित्र अशा स्थळांपैकी ते एक मानले जाते. गुरु तेगबहादुर साहिब यांनी तत्कालीन बंगाल, बिहार, आसामसह देशातील अनेक भागांना भेटी देऊन आपल्या विचारांचा प्रचार–प्रसार केला. १६६६ मध्ये पाटणा (पाटणा साहिब) येथेच त्यांच्या घरी गुरु गोविंदसिंह यांचा जन्म झाला. ते शीखांचे दहावे गुरु होत.

**साहित्य, उपदेश आणि आध्यात्म :** गुरु तेगबहादुर साहिब हे केवळ धर्मगुरुच नव्हते, तर ते उत्तम साहित्यिक आणि रचनाकारही होते. त्यांनी आपल्या अनेक रचनांच्या माध्यमातून शीख तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला. सहज सोप्या भाषेसह त्यांचा भावप्रवाह अतिशय सशक्त आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने वैराग्य, नाम 'सिमरन' (देवाचे स्मरण) आणि जीवनातील नश्वरता हाच ठरतो. त्यांचे विवेचनाचे विषयही धार्मिक, तत्त्वमिमांसक आणि जीवनातील क्षणभंगुरता दर्शवणारे आहेत. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या रचनांना गुरु ग्रंथ साहिबमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचनांना सामान्यतः 'शबद' किंवा भजन म्हटले जाते. ज्यांत ईश्वर, मानवी संबंध, सेवा, मन–शरीर, मृत्यु, प्रतिष्ठा आणि मानवी स्थिती यांसारख्या विषयांचा व्यापक आवाका आढळून येतो.

**संघर्षाचा कालखंड :** गुरु तेगबहादुर सिंह साहीब यांच्या जीवनकार्याचा हा कालखंड भारतीय इतिहासातील अत्यंत आव्हानात्मक असा काळ मानला जातो. परकीय आक्रमकांनंतर दाखल झालेल्या तत्कालीन शासकांची सत्ता भारताच्या बऱ्याच भागात स्थिरावली होती. या सत्तेच्या कट्टरतेचा आणि आक्रमक विस्ताराचा असा काळ होता. मध्ययुगातील हाच काळ तत्कालीन शासकांच्या जुलमी राजवटीचाही मानला जातो. सत्ताधीश हे धार्मिकदृष्ट्या संकीर्ण आणि अत्यंत कडव्या मनोवृत्तीचे होते, असे इतिहास सांगतो. त्यामुळे स्वाभाविकपणे अन्य समुदायांसाठी हा काळ अतिशय खडतर आणि अस्थिरतेने परिपूर्ण असा काळ मानला जातो. अशा या प्रतिकूल परिस्थितीत गुरु तेगबहादुर यांनी अत्याचाराचा प्रतिकार अत्याचाराने नव्हे तर त्यागाने केला.

**सर्वोच्च बलिदान :** गुरु तेगबहादुर साहीब यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे सर्वोच्च बलिदान. साधरणतः १६७५ सालचा तो काळ होता. सत्ताधाऱ्यांच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या काश्मिरी पंडिताचे काही प्रतिनिधी आनंदपूर साहीब येथे गुरु तेगबहादुरांकडे मदत मागण्यासाठी आले होते. या लोकांना सक्तीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जात होते. काश्मिरी पंडितांची ही व्यथा ऐकून गुरु तेगबहादुर साहीब अतिशय धीरगंभीर झाले होते. अशा संकटापासून वाचण्यासाठी आता बलिदानाची गरज आहे, असे उत्तर त्यांनी यावर दिले. 'जर आमच्या गुरुंनी धर्मांतर केलं, तर आम्ही सर्व स्वतःहून तुमचा धर्म स्वीकारू', असे सत्ताधीशाला जाऊन सांगण्याची सूचना त्यांनी काश्मिरी पंडितांना केली. पुढे गुरु तेगबहादुर साहीब हे दिल्लीला पोहचल्यावर बादशहाने त्यांना कैद केले. त्यांना प्रलोभने दाखविली गेली, धर्म स्वीकार करण्यास सांगण्यात आले. गुरुजींनी या दोन्ही गोष्टी नाकारल्या. त्यांच्या समक्षच त्यांच्या शिष्यांना शहीद करण्यात आले. पण, गुरु तेगबहादुर साहीब हे आपल्या निश्चयापासून अजिबात ढळले नाहीत. त्यांनी बादशहाचे आदेश मानण्यास नकार दिला. संतापलेल्या बादशहाने त्यांचे शीर धडावेगळे करण्याचे आदेश दिले. तो आदेश अखेर अंमलात आणला गेला. गुरु तेगबहादुर साहीब यांचे सर्वोच्च बलिदान ज्या ठिकाणावर झाले, ते ठिकाण आज दिल्लीच्या चांदणी चौक परिसरातील 'सीस गंज साहिब' गुरुद्वारा म्हणून ओळखले जाते.

'जर माझ्या बलिदानानं निरपराध लोकांच्या श्रद्धेचं रक्षण होणार असेल, तर तेच माझं सर्वोच्च धर्मकार्य ठरेल', असा संदेश त्यांनी त्यावेळी दिला होता. हे शब्द केवळ त्यागाचे नव्हते, तर संपूर्ण मानवतेच्या रक्षणाची घोषणा करणारे होते. धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेची सर्वोच्च मूल्य जपण्यासाठीच त्यांनी हा निर्णय घेतला होता. 'सीस गंज साहिब' गुरुद्वारा आजही त्यांचा त्याग आणि मानवतेप्रती समर्पणाची साक्ष देतो.

**मानवतेचा संदेश :** शीखांचे गुरु असूनही गुरु तेगबहादुर साहीब यांनी देशाचे रक्षण करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. ते सर्व धर्मांना समान मानणारे होते. सर्व मानव हे एकाच परमात्म्याचे पूत्र आहेत, अशीच त्यांची शिकवण होती. धर्म म्हणजे कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग आहे, हा संदेश त्यांनी समस्त मानवजातीला दिला आहे. त्यांचा हा संदेश आजही प्रासंगिक ठरतो.

– **रमाकांत दाणी**, प्रसिद्धी समन्वयक, संचालक माहिती व जनसंपर्क कार्यालय, नागपूर.

# प्रॉम्पट व ऑनलाईन पेमेंट करणाऱ्या वीजग्राहकांना पावणेसहा कोटींची सवलत

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** महावितरणने ग्राहकांसाठी सर्व सेवा डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या डिजिटल सेवांचा वापर वाढावा, यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन दिले जात आहे. चालू आर्थिक वर्षात महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील वीजग्राहकांनी डिजिटल पर्याय अवलंबून व तत्पर वीजबिल भरणा करून पावणेसहा कोटी रुपयांची सवलत मिळवली आहे.

वीजग्राहकांनी बिलाच्या तारखेच्या सात दिवसांच्या आत ते भरल्यास एकूण रकमेच्या (कर व शुल्क वगळून) जवळपास १ टक्का तत्पर बिल भरणा सवलत, डिजिटल पद्धतीने (नेट बँकिंग, क्रेडिट/डेबिट/कॅश कार्ड, मोबाईल वॉलेट/यूपीआय इ. वापरून) वीजबिल भरल्यास एकूण रकमेच्या (कर व शुल्क वगळून) ०.२५ टक्के डिजिटल भरणा सवलत व गो ग्रीन सेवेचा पर्याय स्वीकारून छापील बिलाऐवजी ई-मेलवर वीजबिल घेतल्यास दरमहा १० रुपये सवलत दिली जाते.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील वीजग्राहकांनी चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर-२०२५ या कालावधीत तत्पर वीजबिल भरणा सवलत ४ कोटी २४ लाख ३६ हजार, डिजिटल बिल भरणा सवलत १ कोटी २१ लाख ८२ हजार व गो ग्रीन पर्याय निवडण्याची सवलत २८ लाख २ हजार अशी एकूण ५ कोटी ७४ लाख २० हजार रुपयांची सवलत मिळवली आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील ग्राहकांनी अनुक्रमे २ कोटी ६४ लाख ८ हजार, ७४ लाख ३६ हजार व १४ लाख २४ हजार अशी एकूण ३ कोटी ५२ लाख ६८ हजार सवलत मिळवली आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलातील ग्राहकांनी अनुक्रमे १ कोटी १८ लाख १ हजार, ३४ लाख ४० हजार व ८ लाख ९३ हजार अशी एकूण १ कोटी ६१ लाख ३४ हजार रुपये सवलत मिळवली आहे, तर जालना मंडलातील ग्राहकांनी अनुक्रमे ४२ लाख २७ हजार, १३ लाख ६ हजार व ४ लाख ८५ हजार सवलत मिळवली आहे.

महावितरणने ग्राहकांना वीज बिल पाहणे व भरणे, तक्रार नोंदवणे, नवीन वीजजोडणी अर्ज, वीजभार व नाव बदलणे इ. सर्व सेवा महावितरण वेबसाईट, महावितरण ग्राहक मोबाईल पद्वारे डिजिटल माध्यमातून सुरक्षित, जलद व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या वेळ, श्रम व पैशांची बचत झाली आहे. त्यामुळे ग्राहकांनी या सेवांचा लाभ घेऊन नियमित व वेळेत ऑनलाईन वीजबिल भरावे तसेच वीजबिलांसाठी गो ग्रीन पर्याय स्वीकारावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## संक्षिप्त

### बाळापूरचे तीन जवान सैन्यात दाखल !



**आत्ताच एक्सप्रेस**

**धर्माबाद/ प्रतिनिधी. गंगाप्रसाद सोनकांबळे/** नुकत्याच जाहीर झालेल्या सैन्यदलातील निवड यादीमध्ये बाळापूर नगरीतील तीन भूमिपुत्रांनी बाजी मारली आहे, श्रीनिवास बासरोड यांची (उठझक्र), लोकेश पलीकोंडावार (उखडक्र) तर राहुल घाटे यांची इडक्र मध्ये निवड झाली आहे. ही निवड केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचे प्रतीक नाही, तर त्यांच्या कठीण परिस्थितीतून त्यांनी दाखवलेला धैर्य आणि आत्मविश्वास आहे,घरची परिस्थिती साधारण असताना सुद्धा या तरुणांनी शिक्षण सोडले नाही; मनात असलेली जिद्द,कष्ट आणि धैर्याने त्यांनी आपले स्वप्न साकार केले आहे.

गावकऱ्यांनी तरुणांच्या यशावर प्रचंड आनंद व्यक्त केला असून, हे यश संपूर्ण बाळापुरसाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या मेहनत, जिद्द, धैर्य आणि कुटुंबीयांच्या अपार संघर्षामुळे त्यांनी दाखवलेला आदर्श गावातील प्रत्येक तरुणासाठी मार्गदर्शक ठरेल. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय,नातेवाईक,गावातील शिक्षक, मित्रपरिवार आदी स्तरावून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांचा ३५० वा शहीदी समागम जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी रोजी होऊ घातलेल्या हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त आयोजीत सोहळ्यास जिल्ह्यातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यामार्फत करावयाच्या पूर्वतयारीचा आढावा आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला.

निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपायुक्त लखिचंद चव्हाण, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ,अन्न निरीक्षक वर्षा रोडे, गुरुद्वारा संस्थांशी संबंधित नंदकुमार अहुजा, गुरुज्ञान सिद्ध रणवीरसिंह , नरेंद्रसिंग तारासिंग जबिंदा, हरिंदरसिंग, जगदेव सिंग, रमेश वधवा, राज्य समिती सदस्य उत्तम चव्हाण, डॉ. सुदाम चव्हाण, करतार राठोड, कुलदीपसिंग छाबडा,सरदार हरिसिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे लाखो भाविक नांदेडमध्ये येत्या २४ व २५ जानेवारी रोजी येणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदाय एकत्र येणार आहेत. श्री गुरु तेग बहादुर यांच्या त्याग, बलिदान व मानवतेसाठी दिलेल्या शहीदीचा इतिहास देश-विदेशात पोहोचवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी https://gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर रस्ते, रेल्वे, बस, वाहतूक व्यवस्था तसेच कार्यक्रमासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी महानगरपालिका, शाळा-महाविद्यालये, पोलीस यंत्रणा व परिवहन विभागाने समन्वयाने सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करावे. जिल्ह्यातून जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांची नोंद घेणे. त्यांच्याशी समन्वय साधून नांदेड येथील वाहनतळ व अन्य अनुषंगिक व्यवस्थांबाबत त्यांना अवगत करणे. या आयोजनासाठी योगदान देऊ इच्छिणाऱ्या व्यक्ति, संस्थांशी समन्वय साधणे, या आयोजनाबाबत तसेच या इतिहासाबाबत जनजागृती करणे यासंदर्भात नियोजन करण्यात यावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. या कार्यक्रमात सर्व समाजातील लोकांचा सहभाग घ्यावा,असे आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक विद्यालये व महाविद्यालयांनी दैनंदिन उपक्रम राबवून जनजागृती करावी,असे आवाहनही त्यांनी केले.

# महाकवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांवर आधारित शुभेच्छा पत्र स्पर्धेचे

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक /प्रतिनिधी/** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी महाकवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांवर आधारित राज्यस्तरीय शुभेच्छा पत्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास रोख चार हजार रुपयांचे तर द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास अनुक्रमे रोख तीन व दोन हजार रुपयांचे बक्षीस दिले जाईल. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाकवी वामनदादांच्या कोणत्याही एका गीताची निवड करून त्यावर आधारित वर्तमानकालीन भाष्य करणारे लेखन करायचे आहे. हे शुभेच्छा पत्र ए फोर आकाराच्या कागदावर तयार करणे आवश्यक असून त्यावर दोन्ही बाजूंनी पाठपोट लिहिता येईल. शुभेच्छा पत्र अधिक आकर्षक बनवण्यासाठी हाताने काढलेली चित्रे किंवा संगणकीय आरेखननाचा वापर करता येईल. ही स्पर्धा पर्यावरणपूरक असावी यासाठी विद्यार्थ्यांना सुकलेली पाने, फुले आणि बिया यांसारख्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेत भाग घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले नाव, पत्ता, शिक्षणक्रम, भ्रमणध्वनी क्रमांक आणि कायम नोंदणी क्रमांकासह तयार केलेले शुभेच्छा पत्र येत्या दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रा. विजयकुमार पाईकराव, प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, पिन क्रमांक - ४२२२२२ या पत्त्यावर टपालाने पाठवायचे आहे.

### सेवा स्टॉलच्या माध्यमातून सेवेची सुवर्णसंधी: जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/प्रतिनिधी/** नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी हिंद दी चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त भव्य विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून तसेच राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त नांदेड येथे उपस्थित राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर, कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी शहरातील विविध ठिकाणी सेवा स्टॉल्सची उभारणी करण्यात येत आहे. या सेवा स्टॉल्सवर भाविकांसाठी चहा, पाणी, नाश्ता, फलाहार आदी सुविधा निःशुल्क स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या सेवाकार्यासाठी विविध सेवाभावी संस्था, व्यापारी व व्यावसायिक आस्थापना, उद्योजक, शासकीय कार्यालये, बँकिंग क्षेत्र तसेच सेवा देण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी नोंदणी केली आहे. अधिकाधिक भाविकांना उत्तम सेवा देता यावी यासाठी आणखी जास्तीत जास्त संस्था व नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

सेवा हीच खरी श्रद्धांजली असून, सेवा स्टॉलच्या माध्यमातून समाजसेवेची संधी सर्वांनी साधावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. सेवा स्टॉल्सच्या नोंदणीसाठी इच्छुकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे तहसीलदार महसूल यांचेशी संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

# बदलापुरात ऐतिहासिक भव्य धम्म परिषद संपन्न झाली

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदलापूर/विशेष प्रतिनिधी. सागर तायडे/** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याची स्थापना होण्यासाठी झालेल्या लढाई अश्वाचा घोड्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता.ते घोडे बदलण्याचे प्रसिद्ध ठिकाण म्हणून प्रसिद्ध असणारे गांव म्हणजेच बदलापूर. आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी बदलापूर येथे दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी गौरी मंगल कार्यालय मांजर्ली बदलापूर पश्चिम जिल्हा ठाणे येथे भव्य धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.त्याला प्रसिद्ध पूज्य भिख्खू संघ आणि ठाणे जिल्हा व मुंबईतील धम्म उपासक उपासिका यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. पूज्य भंते संघपाल (श्रमण शिक्षा अभियान) अध्यक्ष संघपाल धम्म लाईफ बुद्धिस्ट फाउंडेशन यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने बदलापूर येथे संपन्न झालेली भव्य धम्म परिषद विविध संस्था संघटना यांच्या पुढाकाराने शंभर टक्के यशस्वी झाली.त्यात विशेष पूज्य भंते करुणानंद महाथेरो, (दि ग्रेड हॅपिनेस यू ट्यूब चॅनल) धम्म परिषद अध्यक्ष,उद्घाटक पूज्य भंते डॉ.एन आनंद महास्थवीर,विशेष उपस्थिती पूज्य भंते विनाचार्य महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन, पूज्य भंते चांदीमा थेरो,पूज्य भंते यश थेरो श्रीलंका,पूज्य भंते ज्ञानरक्षित थेरो, पूज्य भंते गुणानंद अभिभू, पूज्य भंते धम्मानंद, पूज्य भिख्खुणी अभिन्ना, पूज्य भिख्खुणी सुनंदा बोधी, पूज्य भिख्खुणी बुद्ध कन्या आणि आदरणीय डॉ भिमराव यशवंतराव आंबेडकर राष्ट्रीय ट्रस्टी कार्याध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रमुख पाहुणे व अनेक मान्यवरांच्या उपस्थित पूज्य भंते संघकीर्ती महास्थवीर यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध ८८ शिक्षणक्रमांचे प्रवेश सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक /प्रतिनिधी/** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ११ विद्याशाखेंतर्गत असलेल्या विविध ८८ शिक्षणक्रमांचे शैक्षणिक सत्र जानेवारी २०२६ करीता नवीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश सुरु करण्यात आलेले आहेत. तसेच जानेवारी २०२५ या सत्रात ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षास प्रवेश घेतलेला आहे; अशा विद्यार्थ्यांसाठी द्वितीय वर्षाचीही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. विनाविलंब शुल्कासह ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठीची अंतिम मुदत ही येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे. शासनाचे नवीन शैक्षणिक धोरण व विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार कृषी शिक्षणक्रम, बी. एड. (सेवांतर्गत), बी. एड. (विशेष) तसेच विज्ञान विद्याशाखेच्या शिक्षणक्रमांव्यातिरिक्त उर्वरित सर्व शिक्षणक्रमांसाठी जानेवारी २०२६ या सत्राकरिता प्रवेश प्रक्रियेची पूर्वतयारी पूर्ण झाली आहे. विद्यार्थ्यांना नियमित पदवी सोवत दूरशिक्षणाद्वारे अधिकची एक पदवी घेता येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी दिली आहे.

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापनेपासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजातील विविध घटकातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. त्यातून अनेक विद्यार्थी प्रशासकीय व खाजगी संवेत उच्चपदावर कार्यरत आहेत. मानाची पदे भूषवत आहेत. हे विद्यापीठ सर्वसामान्य ते विशेष पारंगत अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे प्रवेशद्वार ठरत आलेले आहे. येथे विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख तसेच वेब रेडिओ, दृकश्राव्य माध्यम व मोबाईलद्वारे देखील मार्गदर्शन केले जाते. दोनवेळा आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित, दूरशिक्षण क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य यूजीसी मान्यताप्राप्त व महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहोचलेले एकमेव मुक्त विद्यापीठ आहे. विद्यापीठातर्फे सेनादल सैनिक, बंदीजन, कृषि सेवक, शेतमजूर आणि समाजातील इतरही घटक यांच्यासाठी विशेष शिक्षणक्रम आहेत. शिवाय ए.आय. डाटा सायन्स, सायबर क्ट ते बीए, बीकॉम, एम. ए., एम. कॉम., एम. लिब., एम. सी. ए. यासह विविध व आधुनिक कौशल्य विकासाचे प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. हे सर्व शिक्षणक्रम नोकरदारांना आपली नोकरी व व्यवसायिकांना आपला व्यवसाय सांभाळून पूर्ण करता येतात. त्यामुळे संबंधित इच्छुकांना आपले राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची व सर्वार्थाने प्रगती साधण्याची संधी उपलब्ध होत आहे. त्या अनुषंगाने दिनांक २० जानेवारी २०२६ पासून विद्यापीठाच्या ११ विद्याशाखेंतर्गत विविध ८८ शिक्षणक्रमांचे ऑनलाईन प्रवेश सुरु करण्यात आले आहेत. त्यात प्रमाणपत्र - ३२, पदविका - ३०, पदवी - ११ व पदव्युत्तर १५ शिक्षणक्रमांचा समावेश आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही फक्त ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे शुल्क देखील ऑनलाईन पद्धतीने भरून विद्यार्थ्यास प्रवेश अर्ज सादर करता येईल. प्रवेशासाठीची अंतिम मुदत ही येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे. ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या विहित मुदतीत विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटला भेट द्यावी. तेथे -dmission या पर्यायावरून Prospectus येथे विविध शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिका उपलब्ध आहेत.

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक : कुंडलिकराव अतकरे



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक असुन शासकीय विभागीय ग्रंथालयातील ग्रंथांचे दालन सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन मराठी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचे कार्यक्रमप्रसंगी उदघाटक म्हणून अतकरे बोलत होते. अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह गुलाबराव मगर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, देवगिरी कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापक श्रीमती वनिता निकम,जीवन कुलकर्णी व देवगिरी हायस्कूलचे शिक्षक कोलते उपस्थित होते.

मातृभाषेचा संस्कार व्यक्तीच्या अंतःकरणात खोलवर रुजलेला असतो.आनंद व दुःखासारख्या तीव्र भावना अनुभवताना मुखातून बाहेर पडलेले उद्गार हे मातृभाषेतीलच असतात.मराठी शब्दसाठा वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील ग्रंथांचे वाचन करण्याचे आवाहन सुनील हुसे यांनी केले.

प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री संतोष जाधव यांनी केले.सुत्र संचालन व आभार प्रदर्शन तांत्रिक सहाय्यक गोविंद खेडकर यांनी केले.शिक्षकवृंद व विद्यार्थी, विभागीय ग्रंथालयाचे सभासद,वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाअखेर उपस्थित विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथ वाचन केले.

ग्रंथप्रदर्शन दि.२८ तारखे पर्यंत सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या ग्रंथप्रदर्शनाला भेट द्यावी व शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सभासद होऊन येथील वाचन सुविधेचा लाभ घेण्याविषयी आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

# शहीदी समागम कार्यक्रम जागतिक स्तरावर नेण्यासाठी समन्वयाने काम करा: राज्यमंत्री

## 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाची आढावा बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/प्रतिनिधी/** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम नांदेडपुरता मर्यादित न राहता जागतिक स्तरावर पोहोचावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने, काटेकोर नियोजनासह जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

नांदेड येथे होणाऱ्या या शताब्दी वर्ष कार्यक्रमाच्या आयोजनाचा राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स) सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, विभागीय माहिती उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, कार्यक्रमस्थळी पुरेसे पिण्याचे पाणी, स्वच्छ व पर्याप्त शौचालय व्यवस्था सुनिश्चित करण्यात यावी. कार्यक्रमाची प्रचार-प्रसिद्धी व्यापक प्रमाणात करण्यात यावी. स्थानिक स्तरावर होणाऱ्या उपक्रमांमध्ये लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आवश्यक असून सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व मुद्रित माध्यमांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जावी, असेही त्यांनी निर्देश दिले.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती व प्रेरणा निर्माण व्हावी, यासाठी शाळा स्तरावर निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करून त्याची माहिती पोर्टलवर अपलोड करावी. तसेच सिनेमागृहांमध्ये भक्तिगीत प्रसारित करणे, प्रत्येक जिल्ह्यात होर्डिंग्ज लावून कार्यक्रमाचा संदेश पोहोचवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. मुख्य कार्यक्रमास महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना सहज सहभागी होता यावे, यासाठी पार्किंग क्षेत्रापासून कार्यक्रमस्थळापर्यंत योग्य वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देशही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

'हिंद दी चादर' कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासन सज्ज - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी असरजन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५२ एकर मैदानावर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मंत्री, संत-महात्मे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने मैदानावर युद्धपातळीवर काम सुरू असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून, मैदानालगत दोन भव्य टेन्ट सिटी उभारण्यात आल्या आहेत. एका टेन्ट सिटीत सुमारे १४ हजार भाविकांची निवास क्षमता असून, यासोबतच शहरातील मंगल कार्यालये व शाळांमध्येही निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. कार्यक्रमस्थळी स्वच्छता, स्वयंसेवक व्यवस्था, विविध प्रकारचे मोफत सेवा स्टॉल्स, तसेच मोठ्या प्रमाणात वैद्यकीय सेवा नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये ५० हजार नेत्र तपासणी व विशेष कर्करोग तपासणी स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत.

भाविकांसाठी भव्य लंगर व्यवस्था करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे १० लाख भाविकांना घेता येणार आहे. निवास, भोजन, वाहतूक, आरोग्य व सुरक्षा याबाबत सर्व विभाग समन्वयाने काम करीत असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आतापर्यंत करण्यात आलेल्या व पुढील कालावधीत राबविण्यात येणाऱ्या प्रचार-प्रसिद्धी उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा : जल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी मोदी मैदान, नांदेड येथे भव्य-दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील सर्व समाजातील भाविक, सामाजिक संस्था, संघटना व स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी सकारात्मकतेने पुढाकार घेवून आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

येथील जिल्हा नियोजन सभागृहात हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, किशन राठोड, लखीम सिंग, विलास राठोड, महंत नेहरुजी महाराज आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने जालना जिल्ह्यात जिल्हा प्रशासनामार्फत या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनामार्फत काटेकोर नियोजन करण्यात या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनामार्फत काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, आणि सीएसआरच्या माध्यमातून आपल्या जिल्ह्यातून शक्य तेवढी मदत पोहचविण्याचे नियोजन जिल्हा प्रशासन आणि समाज घटकांमार्फत करण्यात येत आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाची माहिती जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांना व्हावी यासाठी विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयामध्ये प्रभात फेरीचे आयोजन करुन, सतिंदर सरताज यांचे भक्ती गीत गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करुन या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर जी यांचे महान कार्य आणि हौतात्म्याचा इतिहासाची माहिती विद्यार्थी-विद्यार्थीना देण्यात आली आहे. तसेच या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मिडिया, होर्डिंग्स, फ्लेक्स, प्रसिध्दी पत्रके, चित्ररथ, शासकीय-निमशासकीय कार्यालये, चित्रपट गृहे, बस स्थानक, रेल्वे स्टेशन, मुख्य चौक व मुख्य रस्त्यांवर फ्लेक्स, बॅनर, होर्डिंग्स् आदीच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील जास्तीत-जास्त भाविकांना या कार्यक्रमास उपस्थित राहाता यावे यासाठी विशेष रेल्वे आणि बसेसचे नियोजन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्व समाज एकत्र येवून त्यांच्यात देशभक्ती निर्माण होणार आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन जिल्हाधिकरी श्रीमती मित्तल यांनी केले.

यावेळी विविध समाजातील मान्यवर आणि नागरिकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत रोजगाराचा विचार करावा: प्रा. डॉ. कार्तिक गावंडे



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** खरपुडी (ता.जालना) येथे अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) च्या शिबिराचे आयोजन पार्थ सैनिकी शाळा खरपुडी येथे करण्यात आले आहे शिबिरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींचा गांभीर्याने विचार करावा, असे मत प्रा.डॉ.कार्तिक गावंडे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रा.डॉ.शंकर तिकांडे यांनी विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करून स्वतःची ओळख निर्माण करावी असे प्रतिपादन केले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.मसुद अन्सारी, प्रा.डॉ.बद्रीनाथ शिंदे तसेच कृष्णा उगले यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा.डॉ.गावंडे म्हणाले की, ग्रामविकास साकार करण्यासाठी युवकांनी व्यावसायिकता अंगीकारणे आवश्यक आहे. बदलत्या काळात कौशल्याधारित शिक्षण, उद्योगशीलता आणि सामाजिक भान यांचा समतोल साधल्यास ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास शक्य आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिबिरार्थी रोहित मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शंकर साळवी यांनी केले. कार्यक्रमास शिबिरार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शहरातील प्रत्येक समस्या सोडवण्याचा संकल्प

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसवेक भास्कर आबा दानवे यांच्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व श्री. कल्याण जगदीश भदनेकर हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले असून, या विजयाच्या निमित्ताने वैभव कॉलनीच्या वतीने भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, माझ्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व श्री. कल्याण भदनेकर आम्हाला मोठ्या मताधिक्यांनी आपण निवडून दिले असून, नागरिकांचा विश्वासच आपली खरी ताकद असल्याचे सांगत, येणाऱ्या काळात प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या समस्या सोडवून प्रभाग क्रमांक १ चा सर्वांगीण विकास करण्याचा निर्धार यावेळी त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात बोलताना नवनिर्वाचित नगरसेवकांनी स्पष्ट केले की, प्रभाग क्रमांक १ चा विकास हा आमचा प्राधान्यक्रम असून, प्रत्येक प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यावेळी प्रतिक भैय्या दानवे, श्री. जीवन सले, श्री. रवी सले, श्री. अजित मानधनी आदी यांच्यासह प्रभागातील सांगळे काका-काकू, भाऊराव फदाट, शामराव राठोड, निवरकर साहेब, सुशीलकुमार बेघानी, शेख साहेब, काळे साहेब, कपिल दहेकर,मनोज भैय्या वाघ, भरत निवरकर, बबलू टेकाळे, गजानन बागल, विकास राठोड, रवी जाधव, विशाल फदाट, राहुल जामुंदे, सौरभ उंद्रे व आदित्य उगले आदींची उपस्थिती होती.

### शिवछत्रपती महाविद्यालयात पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** पाचोड शिवछत्रपती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य माहिती व तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील करीअर कट्टा उपक्रमा अंतर्गत पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून टी-शर्ट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अंबड येथील पवन अकॅडमीचे संचालक सुरेश जगताप व योगेश शिखरे हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे होते.

यावेळी करिअर कट्टा समन्वयक डॉ.गांधी बानायत व डॉ. तुकाराम गावंडे यांची विशेष उपस्थिती लाभली.कार्यक्रमात योगेश शिखरे यांनी विद्यार्थ्यांना करिअरविषयक सखोल मार्गदर्शन केले.पोलीस भरतीसह विविध शासकीय व निमशासकीय स्पर्धा परीक्षा,त्यांची तयारी, अभ्यासाची दिशा,शारीरिक क्षमता चाचण्या तसेच मानसिक तयारी याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.योग्य नियोजन,सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीवर भर देत विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून पुढे जावे,असे आवाहन त्यांनी केले.

## अंबड नगरपरिषदेला स्थैर्याचा नवा कणा, उपनगराध्यक्षपदी विश्वजीत खरात यांची बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** अंबड नगरपरिषदेच्या राजकारणात स्थैर्य आणि एकमताचे चित्र ठळकपणे समोर आले असून, उपनगराध्यक्षपदी विश्वजीत खरात यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. दिनांक २० रोजी पार पडलेल्या नगरपरिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत ही निवड प्रक्रिया अत्यंत शांततेत व सर्वानुमते पार पडली.

नगरपरिषद सभागृहात आयोजित या महत्त्वपूर्ण बैठकीस मुख्याधिकारी श्री. मनोज विष्णुपंत उकिरडे, पिठासीन अधिकारी तसेच नगराध्यक्ष सौ. देवयानी केदार कुलकर्णी उपस्थित होत्या. सभेत उपस्थित सर्व नगरसेवकांनी कोणताही विरोध न करता विश्वजीत खरात यांच्या नावावर शिक्कामोर्तब करत नगरपरिषदेला एक मजबूत नेतृत्व दिले.



याच सभेत कॉक मेंबर म्हणून धनराज दीपकसिंग ठाकूर, सुहास रमेशचंद्र सोडानी यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडीनंतर बोलताना उपनगराध्यक्ष विश्वजीत खरात यांनी सर्व नगरसेवक, अधिकारी व उपस्थितांचे आभार मानत, अंबड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन, पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करण्याचा माझा प्रयत्न राहील, असा निर्धार व्यक्त केला. त्यांची आभार सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या प्रसंगी आमदार नारायण कुचे, माजी आमदार विलासरावबापू खरात, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अवधूत नाना खडके, नगराध्यक्ष देवयानी केदार कुलकर्णी यांच्यासह भाजप व मित्रपक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकमताने पार पडलेली ही निवड अंबड नगरपरिषदेतील राजकीय समन्वयाचे आणि विकासाभिमुख वाटचालीचे स्पष्ट संकेत देणारी ठरली आहे. येणाऱ्या काळात नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड येथे 'माईंड स्पार्क' कार्यशाळा उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**पाचोड/प्रतिनिधी/** येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मानसशास्त्र विभाग, आकाशवाणी केंद्र संभाजीनगर आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'माईंड स्पार्क' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांची मानसिक क्षमता, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. महेंद्र पाटील यांनी 'मन जागृत झाले की व्यक्तिमत्त्व घडते' असे सांगत ताणतणाव व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. मार्गदर्शक धम्मपाल जाधव (आकाशवाणी) यांनी संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासावर प्रकाश टाकला.




प्राचार्य कोठावळे यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असल्याचे सांगत मानसशास्त्र विभागाचे कौतुक केले. डॉ. विलास महाजन यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेची संकल्पना मांडली. यावेळी विविध स्पर्धांमधील विजेत्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप सातोणकर यांनी केले, तर प्रा. विनोद कांबळे यांनी आभार मानले. या कार्यशाळेला उपप्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'हिंद दी चादर'कार्यक्रमाच्या प्रचार प्रसाराकरीता महारॅलीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास देश-विदेशातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, या कार्यक्रमास जालना जिल्ह्यातील भाविकांना नागरिकांना उपस्थित राहता यावे यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. या महासोहळ्यात शीख, सिकलीगर, बंजारा,लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन आणि वारकरी संप्रदायातील भगत नामदेव समाज आदी समाजासह इतर समाजातील सुमारे ९ ते १० लाख भाविक सहभागी होणार आहेत.

जालना जिल्ह्यात या ऐतिहासिक कार्यक्रमाचा विविध माध्यमातून मोठ्या प्रमाण प्रचार प्रसार करण्यात येत आहे. याच अनुषंगाने जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागामार्फत दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ८ वाजता गांधी चमन ते शिवाजी चौक महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या महारॅलीत जालना शहरातील २१ शाळेतील सुमारे ५ हजार विद्यार्थी-विद्यार्थीनी, विविध समाज घटकातील प्रतिनीधी-भाविक, शासकीय अधिकारी-कर्मचारी, नागरिक सहभागी होणार आहेत. या भव्य महारॅलीत जालनाकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाधिकरी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## पर्यावरण संवर्धन काळाची गरजः डॉ.संजय पाटील

### रा से यो शिबिर बौद्धिक सत्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** आज पर्यावरणाचे संतुलन बिघडताना दिसून येते. हे संतुलन कायम ठेवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी काम करणे गरजेचे आहे.पर्यावरणाच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करावी पर्यावरण संवर्धन म्हणजे स्वतःचे संरक्षण करणे होय हे माणसाने ओळखले पाहिजे.मानवी समूहाला जर सुरक्षित राहायचे असेल तर पर्यावरणाचे जतन केले पाहिजे,ती काळाची गरज आहे.असे प्रतिपादन डॉ. संजय पाटील यांनी केले.




मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिर मौजे खरपुडी येथे सुरू आहे.या शिबिरातील दुपारच्या बौद्धिक सत्रात अंकुशराव टोपे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते.याप्रसंगी बोलताना डॉ.पाटील असे म्हणाले की,आज आपण जे अन्न सेवन करतो ते रसायन विरहित आहे का? पाणी आणि हवा स्वच्छ आहे का? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे.दिवसेंदिवस माणसाची प्रतिकारशक्ती कमी होत आहे ती वाढविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.जर्मनी, स्वित्झर्लंड,कॅनडा या देशामध्ये पर्यावरण संरक्षण हिच राष्ट्रभक्ती आहे. तशी भावना आपल्याही देशातील मानवी समूहामध्ये येणे गरजेचे आहे. प्लास्टिक वापरावर सुद्धा बंदी करणे आवश्यक आहे. वृक्ष लागवडीशिवाय पर्यावरणाचे संरक्षण होणार नाही.यासाठी जनजागृती गरजेची आहे.ही जबाबदारी महाविद्यालयीन तरुणावर आहे याची जाणीव प्रत्येकानी ठेवावी असे ते म्हणाले.

या बौद्धिक सत्राचे अध्यक्षस्थानी डॉ रामदास वैद्य होते.याप्रसंगी बोलताना ते असे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये काम करणारा स्वयंसेवक हा यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही.तसेच पर्यावरणाच्या संतुलनासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावे.या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा अविनाश भालेराव,डॉ मसूद अन्सारी,डॉ बद्रीनाथ शिंदे,श्री रघु शिंदे,श्री भारत बर्डे तसेच रा से यो स्वयंसेवक यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल चव्हाण तर आभार रोहन डोंगरे याने व्यक्त केले.

## जिल्हा स्त्री रुग्णालयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामार्फत 'स्तनपान विषयक' उपक्रम

### मातेचे दूध म्हणजेच अमृत -अधिष्ठाता डॉ.सईदा अफरोज

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना शहरातील गांधीचमन येथील जिल्हा रुग्णालयात अधिक्षक डॉ.एस.झेड.गवारे रुजू झाल्यापासून सतत विविध रुग्ण हितासाठी नावीन्य पूर्ण उपक्रम घेतले जातात. असाच एक 'स्तनपान ' विषयक उपक्रम शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्त्री रोग व प्रसूती विभागामार्फत डॉ. वर्षा देशमुख व डॉ. ज्योती कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय वैद्यकीय विद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ.सईदा अफरोज यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



मातेचे दूध हे नवजात बाळासाठी अमृत असते ते जन्मतहा तात्काळ पाजणे आवश्यक असते, असे डॉ.सईदा अफरोज यांनी आपल्या भाषणाप्रसंगी सांगितले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. सईदा अफरोज या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपअधिष्ठाता डॉ. गट्टानी,डॉ. कुरील व श्री अविनाश जाधव, सह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या विशेष कार्यक्रमात नवीन सुरुवात करत असलेल्या स्तनपान मार्गदर्शन कक्षाबाबत सविस्तर माहिती व मार्गदर्शन स्त्री रोग विभागप्रमुख डॉ.वर्षा देशमुख यांनी दिली. तर शासकीय वैद्यकीय महाविद्याल,ज्लिहा स्त्री रुगणालयाच्या कामकाजबाबत सविस्तर माहिती बधीरीकरण विभागप्रमुख डॉ. ज्योती कुलकर्णी यांनी दिली. यावेळी अधिष्ठाता डॉ.सईदा अफरोज यांनी रुग्णालयातील सर्व कक्षाची पाहणी केली व कामकाजबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी अधिष्ठातामार्फत स्त्री रोग व प्रसूती विभाग व बधीरीकरण विभागप्रमुख यांच्या कार्यालयाचे फित कापून उद्घाटन केले. जिल्हा स्त्री रुगणालयातील विविध बाबीबाबत वर्ग १ स्त्री रोग तज्ञ डॉ. प्राची तारसेट्टीवर यांनी माहिती दिली तर अधिपरिचारिका व प्रसूती विषयक कामकाजबाबत माहिती प्रभारी मेट्रॉन विद्या पवार यांनी दिली. रुग्णालयातील सर्व विभागातील प्रमुख इन्चार्ज सिस्टर यांनी दालनात नूतन अधिष्ठाता डॉ. सईदा.अफरोज यांचे स्वागत केले व कामकाजबाबत माहिती दिली. या कार्यक्रमासाठी रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी अधिपरिचारिका, महिला कर्मचारी व प्रसूत महिलांचे महिला नातेवाईक उपस्थित होते. सर्वांनी या नावीन्य पूर्ण उप्रमाबाबत समाधान व्यक्त केले. जिल्हा स्त्री रुग्णालय हे रुग्ण सेवेबाबत महत्वाचे रुग्णालय आहे. दरमहा या रुग्णालयात ६००-६५० प्रसूती, १००-१५०सिझर होतात. तसेच जन्म:त बाळाला लसीकरण केले जाते. अधिक्षक डॉ. एस.झेड. गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली या रुग्णालयाने शिस्त,स्वच्छता, सुरक्षा याबाबत कायापालट केला आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेत या रुग्णालयाबाबत सर्व स्तरावरून समाधान व्यक्त होत आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्त्री रोग विभागामार्फत चालू करण्यात आलेला हा स्तनपान विषयक कार्यक्रम अत्यंत स्तुतीप्रिय आहे. त्याबद्दल नूतन शासकीय वैद्यकीय विद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. सईदा अफरोज यांचे व विभागप्रमुख डॉ. वर्षा देशमुख, डॉ. ज्योती कुलकर्णी, डॉ. प्राची तारसेट्टीवर यांचे सर्व कर्मचारी व रुग्ण नातेवाईकांकडून अभिनंदन होत आहे. डॉ.संतोष राऊत,डॉ. पियुष होलानी,डॉ.राजगिरे यांनी या कार्यक्रमाबाबत मनोगत व्यक्त केले. उत्कृष्ट कार्याबद्दल अधिष्ठातांच्या हस्ते सुरक्षा रक्षक दीपाली व अनिकेत यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ. बोकणकर,डॉ. वेदा गोयल,डॉ. गायकवाड हे देखील उपस्थित होते.या कार्यक्रमाची सर्व तयारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाती अधिपरिचारक श्री आशिष भालटतिलक व श्री विवियन ब्रदर यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्य औषध निर्माण अधिकारी शहानवाज अहमद यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813